वेणूताई चव्हाण कॉलेज कराड

नोटीस

दिनांक 9/08/ 2024

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, रक्षाबंधन निमित्त IQAC, विद्यार्थिनी मंडळ आणि इनोव्हेशन व स्टार्टप सेलच्या संयुक्त विद्यमाने ‘ राखी निर्मिती कार्यशाळा’ शुक्रवार दिनांक 16 ऑगस्ट 2024 व राखी विक्री स्टॉल उपक्रम’ शनिवार दिनांक 17 ऑगस्ट 2024 रोजी महाविद्यालयात होणार आहे त्यासाठी नाव नोंदणी करावी.

प्राचार्य

वेणूताई चव्हाण कॉलेज कराड

IQAC, विद्यार्थिनी मंडळ, इनोव्हेशन व स्टार्टअप सेल

राखी निर्मिती कार्यशाळा व राखी विक्री उपक्रम

अहवाल 2024-25

श्री शिवाजी शिक्षण संस्था, कराडच्या उच्च शिक्षण मंडळ, कराडचे वेणूताई चव्हाण कॉलेज ,कराड मधील IQAC, विद्यार्थिनी मंडळ, इनोव्हेशन व स्टार्टअप सेल च्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी राखी निर्मिती कार्यशाळा व विद्यार्थ्यांद्वारे राखी विक्री उपक्रमाचे आयोजन शुक्रवार व शनिवार दिनांक 16 व 17 ऑगस्ट रोजी करण्यात आले. राखी निर्मिती कार्यशाळेसाठी साधन व्यक्ती म्हणून मा. मंजिरी पाटील होत्या त्यांनी विद्यार्थ्यांना राखी बनविण्याचे प्रात्यक्षिके दाखवून त्यांच्याकडून राख्या तयार करून घेतल्या. या कार्यशाळेचे व राखी विक्री उपक्रमाचे उद्घाटक व अध्यक्ष कॉलेजच्या प्राचार्य प्रा. डॉ. श्रीमती एस आर सरोदे होत्या. मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या की विद्यार्थ्यांनी वेगवेगळी कौशल्ये आत्मसात करावीत आणि त्या कौशल्यांचा वापर स्वतःचा स्टार्टअप सुरू करून अर्थार्जन करावे असा उपदेश केला. राखी विक्री स्टॉलला भेट देण्यासाठी श्री. शिवराज माने, निवृत्त मुंबई पोलीस अधिकारी, रोटरी क्लब ऑफ कराडचे पदाधिकारी तसेच ज्येष्ठ प्रा. डॉ.आर आर थोरात, डॉ.श्रीमती एम.ए.शिंदे, डॉ.जे.यु.दीक्षित यांच्यासह सर्व प्राध्यापक,प्राध्यापिका व विद्यार्थी उपस्थित होते. या उपक्रमासाठी विद्यार्थिनी मंडळाच्या निमंत्रक श्रीमती टी. टी.सरकाळे व इनोवेशन व स्टार्ट-अप सेलचे निमंत्रक डॉ.ए.बी.मुळीक, सदस्य प्रा. श्रीमती एस पी पाटील यांच्यासह सर्व सदस्यांनी प्रयत्न केले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक व स्वागत प्रा.श्रीमती टी. टी.सरकाळे,डॉ.श्रीमती एन.एस.देसाई यांनी आभार व प्रा.श्रीमती आफ्रीन मुजावर यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यशाळेस बहुसंख्य विद्यार्थी व विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. या उपक्रमाचे आउटकम म्हणजे या उपक्रमामुळे अनेक विद्यार्थ्यांना राखी बनवण्याची कौशल्य विकसित झाली त्याचबरोबर बनवलेली राखी विकून पैसे कसे मिळवता येऊ शकतात हे राख्या विकून प्राप्त झालेल्या नफ्यावरून सिद्ध झाले.

डॉ.ए.बी.मुळीक
निमंत्रक
इनोवेशन व स्टार्ट-अप सेल

श्रीमती टी. टी.सरकाळे
निमंत्रक
विद्यार्थिनी मंडळ

डॉ.श्रीमती एस.आर.सरोदे
प्राचार्य
वेणूताई चव्हाण कॉलेज ,कराड

वेणूताई चव्हाण कॉलेज कराड

IQAC, विद्यार्थिनी मंडळ, इनोव्हेशन व स्टार्टअप सेल

राखी निर्मिती कार्यशाळा व राखी विक्री उपक्रम

अहवाल 2024-25

Program Photo

डॉ.ए.बी.मुळीक
निमंत्रक
इनोवेशन व स्टार्ट-अप सेल

श्रीमती टी. टी.सरकाळे
निमंत्रक
विद्यार्थिनी मंडळ

डॉ.श्रीमती एस.आर.सरोदे
प्राचार्य
वेणूताई चव्हाण कॉलेज ,कराड